# नियमीत दिवाणी मुकदमा नं. १३८/२०१९ मधील निशाणी ३२ वरील आदेश

(नामदेव हरी मढवी,१ वि. गजानन हरी मढवी)

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–६, नियम–१७ व दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश–२२, नियम–१० प्रमाणे दाव्यात दुरुस्तीसाठी केला आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे देवून हरकत घेतली आहे. सदर प्रतिवादीने पुढे असे कथन केले आहे की, वादीचा सदरचा अर्ज खोटा व खोडसाळ असून तो त्यास मंजूर नाही. वादी मागत असलेली दुरुस्तीस कोणतीही परिस्थिती निर्माण झालेली नाही. सदर प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, वादींना दावा फेटाळण्याची भिती वाटु लागली असून वादी संपूर्ण दावा दुरुस्ती करु पहात असल्याने वादींचा सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज, म्हणणे व कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय ? | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत–**

५. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, वादींनी सदरचा दावा वाटपाचा, जाहिर होवून मिळणेकरीता व निरंतर ताकीद हुकूमाकरीता दाखल केला आहे. वादींचे पुढे असे कथन आहे की, दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने दावा मिळकत स.नं.८ ही अमर मालाराम गेहलोत व महादेव प्रभाकर झेंडे दिनांक २९.०७.२०२१ रोजी बेकायदेशीरपणे विक्री केलेली आहे. त्यामुळे वादीच्या हक्क व अधिकारांना बाधा पोहोचते. त्यामुळे वादीने अर्जात नमुद दुरुस्त्या मागीतल्या आहेत. वादीने याकरीता नि.क्र. २० सोबत दिनांक २९.०७.२०२१ रोजीच्या खरेदीखताची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने दावा मिळकत स.नं.८ ही अमर मालाराम गेहलोत व महादेव प्रभाकर झेंडे दिनांक २९.०७.२०२१ रोजी विक्री केलेली आहे. स.नं. ८ ही दावा मिळकत असून दावा प्रलंबित असताना त्याची विक्री झालेली आहे. त्यामुळे वादी मागतो ती दुरुस्ती योग्य आहे.

६. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी

मागितलेली दुरुस्ती ही दाव्यातील मुद्दे निश्चितीच्या पूर्वीची आहे. सदर दुरुस्ती झाल्यास प्रतिवादीला अतिरिक्त कैफियत देवून त्याबाबत म्हणणे मांडता येणार आहे. वादीने मागितलेल्या दावा दुरुस्ती या दाव्याच्या दृष्टीने महत्वाच्या असल्याने सदरची दावा दुरुस्ती मंजूर करणे योग्य होईल.

७. सदरचा वादीचा दुरुस्ती अर्ज मंजूर झालेस दाव्यात आवश्यक असलेला मजकूर नमूद केल्यास दावा गुणदोषांवर न्यायनिर्णीत करणेस मदत होणार आहे. सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदर दावा दुरुस्ती करण्यास परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. सबब, वरील विवेचनावरुन मी मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी मत नोंदवत आहे व मुद्दा क्रमांक २ साठी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादींनी पुढील नेमल्या तारखेपर्यंत दाव्यामध्ये योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी. |
| ३. | वादींनी दुरुस्त दाव्याची प्रत न्यायालयासाठी व प्रतिवादींसाठी दयावी. |

ठिकाण – उरण ( निलेश एम. वाली )
दिनांक: ०९.०६.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.